प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९–१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे आम्ही ध्यान शिकवतो.**

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य आहेत. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्तर्षींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

- आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
- प्रेम हा आपला स्वभाव आहे.
- शांतता ही आपली भाषा आहे
- ध्यान हा आपला मार्ग आहे
- हे जग आपले आश्रयस्थान आहे
- सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
- परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

# प्रकाशमार्ग

Volume 4 Issue 4 JANUARY 2012 Rs. 15

## चिंतन

महर्षी कृष्णानंद, अनुवाद : जयंत देशपांडे

आपण नूतन वर्षात प्रवेश केला आहे. आपण २०१२ सालात प्रवेश केला आहे. २०११ साल हे आरंभांचे वर्ष होते. २०१२ साल हे घडामोडींचे वर्ष असेल.

२०११ सालात आपल्याला नव्या ऊर्जा मिळाल्या. आपण जागृती होत असलेली पाहिली. आपण कित्येक सत्ये सामोरी येताना पाहिली. कित्येक ठिकाणी होणाऱ्या उठावांचे पण आपण साक्षीदार होतो. २०११ सालात चैतन्यात पुष्कळ स्थित्यंतरे झाली. आपण नवे आरंभ अनुभवले. हे सर्व वैयक्तिक पातळीपासून ते जागतिक पातळीपर्यंत वेगवेगळ्या पातळ्यांवर घडले. मागील वर्षात नाट्यमय असे बदल घडले नाहीत. तसे बदल अपेक्षितही नव्हते. प्रलय म्हणजेच बदल, ही एकाच वेळी घडणारी घटना नसून, ही एक हळूहळू घडणारी प्रक्रिया आहे. प्रलय म्हणजे परिवर्तनाचा विस्फोट नसून एक हळूहळू घडत जाणारा बदल आहे.

२०११ सालात ज्या प्रक्रियांना सुरुवात झाली, त्या प्रक्रिया २०१२ सालात, चालू राहताना आपण पाहू. लोकांमध्ये आणखी जास्त प्रमाणात आणि आणखी उच्च पातळीची जागृती घडून येईल. आणखी मोठ्या प्रमाणावर सत्ये प्रकाशात येतील. आणखी मोठ्या प्रमाणावर उठाव होतील. चैतन्यात आणखी जास्त प्रमाणात स्थित्यंतरे घडतील. सर्व स्तरांवर जास्त प्रमाणात प्रारंभ होतील. प्रलय म्हणजेच बदल, हा चालू राहील.

नवयुगाची पहाट झालेली आहे आणि ते आपल्याला मायेच्या आणि प्रेमाच्या हाताने अतिशय हळुवारपणे त्याच्या कुशीत घेऊ लागले आहे. नवयुगाच्या वास्तवांना आपण, सध्या घडत असलेल्या जागृतीमुळे आणि विस्तारलेल्या जाणिवेमुळे जाणू शकू. आपण आपल्यात आध्यात्मिक परिवर्तन घडवून, शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी, विश्वाने देऊ केलेल्या संधी ओळखू शकू. आपण आपल्यात जागृत झालेल्या विवेकामुळे परिवर्तनाची आणि नवयुगातील जीवनाची निवड करू शकू.

२०१२ सालाच्या अखेरीस पुष्कळ घडामोडी अपेक्षित आहेत. संभाव्य भीषण विनाशाची भीती लोकांमध्ये पसरलेली आहे. काही घटना निश्चितच घडतील. पण त्यातून होणाऱ्या विनाशाची आपण भीती बाळगू नये. आपण जर आपल्यात परिवर्तन घडवले आणि नवयुगाची निवड केली तर आपण कठीण प्रसंगांतून सहज निभावून जाऊ. आपले आध्यात्मिकीकरण ही आपल्याला भविष्याकडे नेणारी एक ट्रेन आहे. आपण जर ध्यान केले तर सत्य आपण जास्त चांगल्याप्रकारे समजू शकतो, आत्मसात करू शकतो. ज्ञानाने आपल्याला विवेक आणि धीर मिळतो.

ध्यान म्हणजे, ज्ञान संपादन करण्यासाठी, स्वतःला सामर्थ्यवान बनवण्यासाठी आणि स्वतःचे भविष्य घडवण्यासाठी एक संधी आहे. ध्यान करून आपण स्वतःसाठी आणि या पृथ्वीसाठी उज्ज्वल नियती घडवू शकू. आपण जर आपल्या अवतीभवती नजर फिरवली तर आपल्या लक्षात येईल की खूप लोक ध्यान करू लागले आहेत. खूप लोकांनी, अजाणतेपणे का असे ना, या जगाचे भवितव्य घडवण्यासाठी कार्य करायला सुरुवात केलेली आहे.

पुष्कळ प्रकाश–कार्यकर्ते, प्रकाश प्रवाहित करून पसरवत आहेत. हा प्रकाश म्हणजे भौतिक प्रकाश नव्हे, तर अतिसूक्ष्म प्रकाश होय, ज्यामधून संपूर्ण सृष्टीने जन्म घेतला आहे. ह्या प्रकाशाजवळ प्रेम, शांती आणि महान प्रज्ञा आहे. या प्रकाशाजवळ महान विवेक आहे. हा प्रकाश पसरवल्यानंतर सर्वांपर्यंत पोहोचतो, या पृथ्वीवरील प्रत्येकजण व प्रत्येक वस्तूपर्यंत पोहोचतो. माणसे, निसर्ग आणि प्रत्येक वस्तूमात्र हा प्रकाश ग्रहण करतात; त्यांना समजते की, आपण एका महान नवयुगाकडे वाटचाल करीत आहोत आणि ते त्यासाठी स्वतःला तयार करतात.

२०१२ साली लोक प्रकाशाबद्दल अधिक जागरूक होतील. ते प्रकाश अनुभवतील आणि त्यामुळे त्यांच्यामध्ये परिवर्तन घडेल. आम्ही २००८ साली 'लाइट चॅनल्स वर्ल्ड मूव्हमेंट' ला सुरुवात केली. अनेक लोक रोज प्रकाश चॅनल (प्रवाहित) करीत आहेत. आम्ही शाळांसोबत प्रकाश प्रवहनाचे कार्य करू लागलो आणि आतापर्यंत १८ लाखांपेक्षाही जास्त मुलांनी प्रकाश प्रवहन केले आहे आणि लाखो मुले रोज प्रकाश प्रवाहित करीत आहेत. प्रकाश प्रवहनानंतर लोकांच्या आणि त्यांच्या सभोवतालच्या जीवनात आश्चर्यकारक बदल होताना आम्ही पाहत आहोत.

प्रकाश आपली आशा आहे. आपली शक्ती आहे. आपले भविष्य आहे. ■

**मानसा फाउंडेशन (रजि.)**
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर–बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, ९३४२० ३०२५० (सकाळी १० ते दु. ४ पर्यंत)
इ–मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

### आनेकल येथे

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)

**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

Doorways (इंग्रजीत) /
तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)
वार्षिक वर्गणी रू. २००/-
ड्राफ्ट कृपया मानसा लाइट
एज फाउंडेशन च्या नावाने काढावा.
कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.

## वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.




**नोव्हेंबर २०११ – बंगलोर बुक फेस्टिव्हल मधील आपला स्टॉल**

## काही ठळक घडामोडी

- १०-१२-२०११ रोजी ग्रहण समयी तपोनगरातील रहिवाशांनी मेडिटेशन हॉल मध्ये एकत्र जमून चंद्र ग्रहणाच्या विशेष शक्ती संपूर्ण जगास प्रवाहित केल्या.
- २५-१२-२०११ रोजी तपोनगर येथे सकाळी ६ ते संध्याकाळी ६ पर्यंत अखंड ध्यान आयोजित करण्यात आले. शेकडो ध्यानसाधकांनी ह्यात भाग घेतला.
- शंबला गटाचा नवीन वर्ग ८-१-२०१२ रोजी तपोनगर येथे सुरू होत आहे.
- जे विद्यार्थी गेले तीन महिने तीन तास ध्यान करीत आहेत ते १५-१-२०१२ पासून सुरू होणाऱ्या 'रा' विशेष गटात सामील होऊ शकतात.
- ५-२-२०१२ रोजी तपोनगर येथे होणाऱ्या महर्षी अमर जयंती समारंभात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी कृपया ३१-१-२०१२ पर्यंत मानसा कार्यालयात आपले नाव नोंदवावे.

२०१२ वर्षाची डेस्क कॅलेंडर्स उपलब्ध आहेत. एका महान चित्रकाराने काढलेली मानसा आणि अंतर-मानसाची स्केचेस ह्यात आहेत.

गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानाचे, इंटरनेटवरून प्रत्यक्ष प्रसारण विद्यार्थ्यांकरता उपलब्ध राहील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी ई-मेल द्वारा संपर्क साधावा.

गुरुजींच्या व्याख्यानांच्या DVDs एका विशेष ग्रुपच्या सदस्यांसाठी दर महिन्याला उपलब्ध राहतील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी संपर्क साधावा.

## ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०१ | रविवार | शुक्लाष्टमी |
| ०३ | मंगळवार | शुक्ल दशमी |
| ०८ | सोमवार | पौर्णिमा |
| १५ | रविवार | उत्तरायण आरंभ / मकर संक्रांती |
| १६ | सोमवार | कृष्णाष्टमी |
| २१ | शनिवार | शिवरात्री |
| २३ | सोमवार | अमावास्या |
| ३० | सोमवार | रथ सप्तमी |
| ३१ | मंगळवार | शुक्लाष्टमी |

## तपोनगरातील कार्यक्रम

दर रविवारी – व्याख्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत
– विशेष ध्यान आणि प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत

रविवार ०८ – शंबला गटाची बैठक दुपारी २ वाजता

रविवार १५ – 'रा' गटाची बैठक दुपारी २ वाजता

स्पीकिंग ट्री वर मास्टर्सच्या सूचीत गुरुजींचे नाव आले आहे. त्यांचे ब्लॉग वाचण्यासाठी व व्हीडियो पाहण्यासाठी कृपया www.speakingtree.in या वेबसाइटला भेट द्यावी.

गुरुजींसोबत अनौपचारिक बैठक शनिवार, १४-०१-२०१२ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत आयोजित करण्यात येईल. ह्यात भाग घेण्याची इच्छा असणाऱ्यांनी मानसा कार्यालयात आपले नाव नोंदवावे.

## प्रकाश प्रवहन कार्याबद्दल वृत्तांत

- आजवर १८ लाखांपेक्षा अधिक मुलांनी निदान एकदा तरी प्रकाशाचे प्रवहन केले आहे आणि ६०० शाळांतील ३ लाखांपेक्षा अधिक मुले दररोज प्रकाश प्रवाहित करतात.
- ह्या शुद्ध आत्म्यांनी प्रवाहित केलेल्या प्रकाशाचा प्रभाव पडत आहे. वैयक्तिक स्तरावर आणि एखाद्या गटाच्या किंवा शालेय स्तरावर ह्याची प्रचिती येते आहे. जागतिक स्तरावर ह्याचा परिणाम समजणे कठीण असेल परंतु जसजसा प्रकाश अधिकाधिक व्यक्तींना स्पर्श करेल, तसा जागतिक स्तरावर त्याचा साहजिकच परिणाम होईल.
- १ फेब्रुवारी, महर्षी अमरांच्या जन्मदिनी, कृपया संध्याकाळी ६ वाजता तपोनगराशी मानसिक संपर्क साधून ७ मिनिटे प्रकाश प्रवाहित करावा. ■

## प्रकाश प्रवहनाचे अनुभव

माझे आणि माझ्या मैत्रिणीचे भांडण झाले. तिने माझ्याशी बोलणे थांबवले. मी तिच्याकडे प्रकाश प्रवाहित केला. तिने माझ्याशी बोलायला सुरुवात केली.

– पी. एल. विशालाक्षी, एन. एस. एस. कँप, चेन्नई

काल सकाळी मी बेचैन होते कारण माझ्या घरून मला फोन आला नव्हता. मी प्रकाश प्रवाहित केला आणि थोड्याच वेळाने माझ्या आईचा फोन आला!

– एम. रोहिणी, एन. एस. एस. कँप, चेन्नई

रात्री साधारण १० वाजता अचानक एका ७ वर्षाच्या मुलीचे पोट दुखायला लागले. मेट्रनने तिला गोळी दिली पण दुखण्याला आराम पडला नाही. मी तिला प्रकाश प्रवाहित करायला सांगितले. इतर मुले देखील ह्यात सहभागी झाली आणि सर्वांनी मनःपूर्वक प्रकाश प्रवाहित केला. १० मिनिटांनंतर त्या मुलीचे पोट दुखायचे थांबले आणि ती शांतपणे झोपी गेली. मुलांना प्रकाश प्रवहन करून मदत घेताना पाहणे, हा माझ्यासाठी एक आनंदाचा क्षण होता.

– मिस. सुगुणा, निवासी, चेशायर होम फॉर डिसेबल्ड, बंगलोर

## तपोनगर डायरी

सीमा अलमेल, अनुवाद : वैशाली जोशी

तपोनगर हे, आपल्याला ऋषींच्या सहवासात राहण्याची संधी देण्यासाठी, त्यांनी केलेली योजना आहे. येथे केवळ शरीराने राहणे हा या प्रकल्पाचा उद्देश नव्हे; आपल्याला ऋषींच्या उच्चतर कंपनांशी सायुज्य साधता यावे, हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. आध्यात्मिक सहजीवन जगण्याची इच्छा असणाऱ्या लोकांसाठी, या त्रासलेल्या जगाच्या अगदी मधोमध, जगण्याची एक जागा निर्माण करावी यासाठी ही योजना आहे.

येथील रहिवासी म्हणजे ह्या योजनेत सहभागी होणारे लोक आहेत. ते येथील ऊर्जांशी तादात्म्य साधण्याचा आणि आचरणात चांगुलपणा आणण्याचा प्रयत्न करतात. प्रवास म्हटला की कधी पुढे, कधी मागे होणारच. मानवी मर्यादांना आणि भीतीपोटी उद्‌भवणाऱ्या असुरक्षिततेच्या भावनांना मागे टाकण्याच्या त्यांच्या दृढ निश्चयाला मानसी क्षेत्र बळकटी देते. तरी देखील जलद गतीने उदयास येणाऱ्या प्रकाश युगाच्या बरोबरीने पाऊल टाकणे खरंच आव्हानात्मक आहे. त्यांचे प्रयत्न चालू आहेत.

तपोनगरवासी होण्याचा एक अर्थ असाही आहे की आध्यात्मिक होण्याच्या आपल्या प्रयासांचे बारकाईने परीक्षण करणे. तपोनगरवासी होणे म्हणजे सामूहिक हिताचे महत्त्व जाणून ते प्रत्यक्षात आणणे आहे, पण त्याचसोबत वैयक्तिक इच्छास्वातंत्र्य दृष्टिआड न करता दोन्हींमध्ये योग्य संतुलन साधणे सुद्धा आहे. येथे प्रत्येकचजण एकत्वातील एक आहे.

कलियुगाचे साखळदंड अजूनही मनुष्यांना बंधनात ठेवून आहेत. तरी मूठभर लोक त्यांच्यात आणि तपोनगरात प्रकाशयुग स्थापन करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सर्वांना सोबत घेऊन चालणे, त्यांचे परीक्षण न करणे, प्रेम करणे आणि अढी न धरणे, मतभेद सोडवण्यासाठी दैवी शक्तींना समर्पण करणे, या गोष्टी हळूहळू येथील रीत बनत चालल्या आहेत.

तपोनगरवासी होणे म्हणजे केवळ तपोनगरात राहणे नव्हे तर जगाच्या पाठीवर कोठेही एका खऱ्या तपोनगरवासी सारखे जगणे होय. त्या अर्थाने आम्ही सर्वजण ज्यामध्ये ते लोक सुद्धा आले जे येथे स्थायिक झाले आहेत, तपोनगराच्या मूल्यांप्रमाणे जगण्याचा प्रयत्न करीत आहोत.

नोव्हेंबरच्या अखेरीस झालेल्या ग्रहणाने तपोनगराच्या प्रकल्पास खरोखर यशस्वी करण्याच्या आमच्या संकल्पास आणखी ऊर्जित केले. ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंतःकरणाची चळवळ आहे. ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी ही चळवळ आहे. एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत की घोषणा फलक नाहीत. एक अशी चळवळ जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढेच पुरेसे आहे. प्रकाशाला प्रवाहित करा. मग शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाशच करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांत असलेल्या अंधःकाराला दूर करतो. त्यामुळे माणसांत परिवर्तन घडते. माणसांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते आणि ते प्रकाशमय बनते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून शक्तीच्या गाभ्यापासून येणारा अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूलस्त्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्वल भविष्य. आणि तो अदृश्यपणे सर्वत्र वास करून आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगाचे परिवर्तन करूया.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८-०५-२००८ रोजी तारामंडळीय परिषदेने म्हणजेच सप्तर्षींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही प्राचीन ऋषींनी दिलेली सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबला या पृथ्वीवरील प्रकाशाच्या नगरीत राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.

२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि प्रेम सर्वत्र पसरवा.

३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.

४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.

५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.

६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.

७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वतःहून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

(गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
(संकलन: शोभा राव; अनुवाद: पूर्णिमा परुळेकर)

०६–११–२०११

आज मी काही लोकांना दीक्षा दिली. काही वेळा इतर केंद्रांमध्ये आमचे शिक्षक सुद्धा लोकांना दीक्षा देतात. दीक्षा देतेवेळी ऋषी आमच्या माध्यमातून ऊर्जा संक्रमित करतात. ह्या ऊर्जा दीक्षाप्राप्त लोकांसोबत २४ तास राहतात. त्या वेळात ह्या ऊर्जा दीक्षा देण्याची प्रक्रिया करीत असतात. २४ तासांनंतर त्या एक प्रकारच्या निष्क्रिय अवस्थेत राहतात. आपल्याला त्या शारीरिक पातळीवर जाणवत नाहीत, कारण त्या जाणिवेच्या निराळ्या स्तरावर असतात.

आपण सर्वजण ऋषींभोवती जमा झालेले आहोत ते निव्वळ योगायोगाने नसून तशी योजना असल्यामुळे ते घडले आहे व हे काही प्रथमच घडत नाही आहे. आपण हे समजून घ्यावे व या तथ्याचा आनंद घ्यावा की ऋषी आपल्या माध्यमातून ऊर्जा प्रसारित करतात.

आध्यात्मिक वाटचाल ही एखाद्या फुग्यातून केलेल्या प्रवासाप्रमाणे असते. फुगा जर आकाशात उंच जायला हवा असेल तर बरोबर जास्त सामान असून चालत नाही. आपण गरज नसलेले सामान टाकून द्यायला हवे, जसे की वस्तूंविषयी, माणसांविषयी, ठिकाणांविषयी वाटणारी आसक्ती, आपल्या स्वतःच्या उत्कट आवडी व अनुरोध. आपल्यासोबत असणारे बिनगरजेचे सामान प्रथम ओळखले पाहिजे व त्यापासून अलिप्त झाले पाहिजे. आपल्या उत्कट आवडी व अनुरोध जर आपल्याला विचलित करत असतील तर तेही सोडून द्यायला हवे. हा काही फार मोठा त्याग नव्हे.

तीव्र भावना श्रेष्ठ अनुभवांच्या मार्गात अडथळे बनतात. प्रथम त्यांचे उदात्तीकरण करून त्यांना सकारात्मक बनविण्यासाठी आपण जागरुकतेने प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी आपण प्रकाशाचा अनुभव घ्या, संगीत ऐका असे मी सुचवेन.

भ्रष्टाचार, हिंसाचार, विविध स्तरांवर होत असलेले अनेक अन्याय या बाबतीत आपण प्रत्यक्षात काही करू शकत नाही. पण, आपण प्रकाश पाठवू शकतो, आपण स्वतःच्या व जगाच्या जखमांवर मलमपट्टी करू शकतो. ह्या भौतिक स्तरापेक्षा निराळ्या स्तरावर आपण जे करू शकतो ती क्षमता आपण ओळखली पाहिजे आणि आपले तसेच ह्या पृथ्वीवरचे जीवन अधिक आनंदी व अधिक निरामय होण्यासाठी त्या क्षमतेचा वापर करण्यास सुरुवात केली पाहिजे.

मायन लोकांनी भाकीत केल्याप्रमाणे चेतनेतील सर्वात अलीकडचे स्थित्यंतर २८ ऑक्टोबरला घडले. चेतनेतील स्थित्यंतर ही एकाकी घटना नसते. ठराविक कालावधीत घडणाऱ्या अनेक घटनांच्या शृंखलेतून ते घडते. स्थित्यंतर ही सर्वांकरिता एक संधी सुद्धा असते. तिचा उपयोग करणे न करणे आपल्या हातात आहे. स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास तुम्ही सक्षम आहात. आता संक्रमणाच्या प्रक्रियांना सशक्त बनविणाऱ्या नवऊर्जांना इथे येण्यासाठी जास्त वाव आहे. इथे मोठे स्थित्यंतर घडणार आहे.

कधीकधी लोक सांगतात की नियमित ध्यान करून व सुरक्षाकवच असून सुद्धा त्यांना अशक्त वाटते, शक्तीपात झाल्यासारखे वाटते. जेव्हा मदत मागितलेली नसते, तरीही गरज नसताना तुम्ही आपणहून मदत करायला जाता तेव्हा तुम्ही इतरांच्या कर्मांमध्ये ढवळाढवळ करता. स्वाभाविकपणे, त्यांच्या कर्मांचा थोडा हिस्सा तुम्हाला घ्यावा लागतो आणि त्यात तुमच्या ऊर्जा खर्च होतात. तुम्ही फार विवेकाने वागले पाहिजे. जेव्हाही तुम्हाला एखाद्या व्यक्तीला मदत करायची असेल, तुम्हाला काही शंका असल्यास तुम्ही मला विचारा.

ऋषींबरोबर संपर्क साधण्याचे अतिशय सोपे तंत्र असे आहे : असा विचार करा की ऋषी तुमच्या शरीरात तेजस्वी प्रकाशगोलाच्या रूपात आहेत. त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न करा, तुमचा संपर्क घडेल.

आपण साधे सरळ व्हायला हवे. त्यासाठीच तर आपण ध्यान करतो. पुष्कळदा आपणच आपल्या आयुष्यात गुंता निर्माण करतो.

१३–११–२०११

आपण संख्येने कमी आहोत असे समजू नका. १,४४,००० केंद्रातील लाखो लोक ह्या यंत्रणेचा भाग आहेत. भौतिक स्तरावर आपली कधीच भेट होत नाही. आपण संपूर्णतया वेगळ्या पद्धतीने कार्य करतो. आपण ह्या प्रचंड आणि मूक क्रांतीचा एक हिस्सा आहोत ही जाणीव फार सुखावणारी आहे. आपण सूक्ष्म स्तरावर कार्य करण्याची आवश्यकता नसते कारण महान गुरु तिथे आधीपासूनच कार्यरत आहेत. आपण प्रकाश प्रवहन करणे आवश्यक आहे. ऋषींनी राखून ठेवलेल्या काही ऊर्जा आपल्या माध्यमातून प्रवाहित व्हाव्या लागतात. या ऊर्जांना प्रवाहित करण्यासाठी आपल्याला वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात येत असते. आपण आपल्या या महत्त्वाच्या व निर्णायक भूमिकेची जाणीव ठेवावी.

नुकतेच २८ ऑक्टोबरला झालेले चेतनेतील स्थित्यंतर परिणाम करू लागले आहे. ऋषी अशा तऱ्हेचे स्थित्यंतर सावकाश होऊ देतात, कारण मोठा धक्का सहन करणे मनुष्यजातीला कठीण जाते. आपण फक्त थोडे मागे थांबून, प्रत्येक क्षेत्रात स्थित्यंतराचे कार्य कसे चालले आहे त्याचे उत्तेजित न होता व त्रयस्थपणे निरीक्षण करावे. स्थित्यंतरामुळे चांगल्या व वाईट, भयानक तसेच अत्यंत आल्हाददायी अशा सर्वच स्तरांवरील तथ्ये प्रकाशात येण्यास मदत होते. तसेच आपल्याला सुद्धा या तथ्यांना सामोरे जाण्यास मदत होते, सर्व गोष्टी सुस्पष्ट होतात व पुढच्या वाटचालीत मदत होते. परंतु, सामान्य लोकांनी व सत्तेत असलेल्या लोकांनी योग्य वाट निवडायला हवी. स्थित्यंतराच्या शक्ती आपण निवडलेली वाट निश्चित करतात. सांप्रतच्या काळात आध्यात्मिक वाटच आपल्याला वाचवू शकते. स्थित्यंतर हा जुने हिशोब चुकते करून कर्माचा घडा मोकळा करण्याची वेळ सुद्धा असते. मात्र त्यासाठी आपण अत्यंत प्रामाणिक असले पाहिजे, मनापासून पश्चात्ताप केला पाहिजे आणि चुकांची पुनरावृत्ती करता कामा नये. हा महान बदल काही सामान्य बदल नव्हे. अंधारयुगातून प्रकाशयुगाकडे नेणारे महान संक्रमण सुरू झाले आहे. आताच्या स्थित्यंतरामुळे बदलाची गती वाढली आहे.

आपण बदलाचा स्वीकार केला पाहिजे. हे करायला सोपे नाही. या गोष्टीला खूप पदर आहेत, खूप तपशील आहेत. आपण जर बदल स्वीकारला तर आपण पुढच्या युगात असू. आपण निवड करून बदलाचा स्वीकार केला की त्यानंतर पुढे काय होईल त्याची आपल्याला कल्पना नाही.

मानसाच्या कचेरीत फोन कृपया सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत करा; तपोनगर येथे कोणत्या कार्यक्रमात किंवा अभ्यासवर्गात सहभागी होण्यासाठी आपले नाव पुरेसा वेळ आधी नोंदवत चला.

जेव्हाही कोणा व्यक्तीला उपचाराची गरज असेल तेव्हा कृपया मनोजशी संपर्क साधा; इतर कोणाशी संपर्क साधू नका. उपचाराच्या क्रियेला फार साधे, सोपे समजू नका. हे केवळ ऊर्जांचे संकलन करणे व पाठवणे नसते. आपण केवळ उपचारक ऊर्जा पाठवू शकतो. परंतु, कर्मे पूर्णपणे पुढे ढकलणे इ. सारख्या काही गोष्टी आपण ठरवू शकत नाही. त्यासाठी तत्पर असलेल्या विशिष्ट देवतेलाच (संतोषी देवी) ते सांगा व तिच्याकडून ऊर्जा प्राप्त करा.

## गुरुजी उवाच

(गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
(संकलन: शोभा राव; अनुवाद: पूर्णिमा परुळेकर)

आजारी व्यक्तीच्या कर्मांचे काय करायचे, ती कमी करायची की पुढे ढकलायची इ. गोष्टींकडे सुद्धा ती लक्ष देईल.

२०-११-२०११

तुम्ही जर प्रकाशाच्या महासागराचा अनुभव घेण्याच्या तंत्राचा रोज वापर केला तर तुम्ही कायम निरोगी, निरामय व प्रकाशाशी एकतान होऊन राहाल व तुमची थोडी कर्मेसुद्धा जळून जातील. प्रकाशाला सदासर्वदा तुमच्या सोबत राहण्याची विनंती करा आणि तुमच्या कामात मग्न राहा. प्रकाश तुमच्या सोबत सतत असेल.

विश्वाजवळ एक योजना असते, एकप्रकारचा कार्यक्रमच म्हणा ना. आपण त्या योजनेचा एक भाग असतो. सृष्टीच्या निर्मितीबद्दलची पायाभूत सत्ये, पुनर्जन्म आणि कर्माचे कायदे या सर्वांबद्दल समजून घेण्यामुळे आपल्याला जीवनात अग्रिमता ठरविण्यात, विश्वाशी सहजपणे एकरूप होण्यात आणि विश्वाला समजून घेण्यात मदत होते. विश्वासोबत असण्यात अपरिमित आनंद असतो. आपल्या वैयक्तिक योजना ह्या विश्वाच्या योजनांना अनुरूप असायला हव्या. आमची पुस्तके पुन्हा वाचा कारण त्यामध्ये ऋषींकडून समजलेली पायाभूत तथ्ये अंतर्भूत आहेत.

आपल्या समस्या आपल्यालाच सोडवायला हव्या कारण त्या आपणच निर्माण केलेल्या असतात. त्यासाठी आपण आपला विवेक, व्यवहारज्ञान, सामर्थ्य आणि अंतःप्रेरणेचाही वापर करावा. ध्यानामुळे आपली शक्ती वाढते. व्यावहारिक पातळीवर जेव्हा आपण समस्या सोडवू शकत नाही तेव्हा आपण समजून घेतले पाहिजे की त्या समस्या आपण आध्यात्मिक दृष्टिकोनातून सोडवल्या पाहिजेत. त्यासाठी आपण ऋषींची व विश्वाची मदत घेतली पाहिजे. ध्यान करून आपण आपली कर्मे नष्ट केली पाहिजेत.
ध्यानसाधना आपल्या जीवनाला स्थैर्य देते. साधनेमुळे शहाणपण, ज्ञान व दिशा मिळते. म्हणून आपण ध्यान करू व आनंदात जगू.

सत्याचे प्रकटीकरण : आपल्याला कर्मफळे भोगावी लागतात, ज्यामुळे आपल्या वाट्याला कधी सुख तर कधी यातना व समस्या येतात. कर्मांपाशी प्रज्ञा असते आणि जेव्हा आपण ऋषींचे कार्य करत असतो तेव्हा कसे कोण जाणे पण कर्मे आपल्याला त्रास देत नाहीत. आपल्याला जोराचा फटका जरी मिळायचा असला तरी ती त्याचा जोर कमी करतात. हे अविश्वसनीय आहे!

देह, मन व बुद्धी ही स्वतंत्र व्यक्तित्वे आहेत. त्यांच्याजवळ स्वतंत्र ओळख व प्रज्ञा आहे. त्यांच्यापाशी भावना, गुणग्राहकता आणि मते असतात. आपल्या ह्या देणग्यांची जर आपण काळजी घेतली तर त्या आपल्याला अतिशय सुखद अनुभव देऊन कृतज्ञता व्यक्त करतात.

जर तुम्हाला कळलं की प्रकाशाच्या पाठीशी एक व्यक्तित्व असतं जे प्रवाहित होत असतं तर तुम्ही त्याच्याशी एक नातं निर्माण कराल. तिथे प्रेम जागेल. तुम्ही वर्षानुवर्षे जरी प्रकाश प्रवाहित केला तरी प्रेमाशिवाय व नात्याशिवाय काहीही होत नाही.

तुम्ही ध्यानाच्या कोणत्या पायरीवर आहात त्याची चिंता करू नका. प्रकाशाचा अनुभव घेणे सोपे नाही. तुम्ही जेव्हा प्रकाशाचा अनुभव घ्याल तेव्हाच तुम्ही साधनेत मोठी मजल माराल.

ज्यांनी ३ महिन्यांहून अधिक काळ रोज ३ तासांपेक्षा जास्त वेळ ध्यान केले असेल ते रा गटात सामील होण्यासाठी आपले अर्ज पाठवू शकतात. जानेवारी २०१२ पासून आम्ही रा गटात नवीन लोकांना घेणार आहोत.

२७-११-२०११

प्रकाशाचे अनुभवन आपण गांभीर्याने घेतले पाहिजे. मला विश्वास वाटतो की असा एक अनुभव सुद्धा आपल्या आयुष्यात शांती आणून, आपल्याला समंजसपणे, जबाबदारीने व योग्य रीतीने वागायला लावून आपले जीवन बदलून टाकेल. आपल्याला बदलावे लागेल, आपली स्पंदने बदलून अधिकाधिक तरल होत चाललेल्या पृथ्वीच्या कंपनांशी मिळती जुळती करावी लागतील. प्रकाश प्रत्यक्ष ईश्वरच आहे. आपण त्याचा अनुभव भावनिक, बौद्धिक आणि अर्थातच आध्यात्मिक पातळीवर घेतला पाहिजे.

आपण समजून घेतले पाहिजे व मान्य केले पाहिजे की प्रकाश कार्यकर्त्यांनी प्रवाहित करून आणलेले ज्ञान जे इंटरनेटवर उपलब्ध आहे ते सर्व निर्दोष नाही. प्रकाश कार्यकर्त्यांचे इतर स्तरांवर स्वतःचे स्रोत आहेत. त्यांच्या पुस्तकांत अतिशय मौल्यवान माहिती आहे. परंतु, ऋषी सर्वोच्च स्तरावरून कार्य करतात, त्यामुळे ते सत्य जाणतात. यासाठी इतरत्र वाचलेल्या सर्व गोष्टी पूर्णपणे स्वीकारू नका व पूर्णपणे नाकारूही नका. तुमच्या अंतःप्रेरणेच्या साह्याने माहिती तपासून घ्या, मला विचारा, खात्री करून घ्या, पण वाचणे थांबवू नका.
आपण समजून घ्यावे की ह्या प्रकाश कार्यकर्त्यांचा आपल्या ऋषींशी संपर्क नाही. कदाचित ऋषींच्या अस्तित्वाविषयी ते पूर्ण अनभिज्ञ असतील. त्यांचा स्रोत निराळा असतो. ऋषींचा अशा गोष्टींवर अंमल नसतो.

ऋषी कधीही ईश्वराच्या इच्छेविरूद्ध जात नाहीत. पण, कधीकधी स्वतःचे तारतम्य वापरून ते बरेच काही करतात.
हा ऋषींचा मार्ग आहे. त्यामुळे तुमचे 'हुद्दे' तुमच्यापाशीच असूद्या. त्यांना इथे आणू नका.

आपल्याला दीक्षा मिळाल्या क्षणापासून आपण ऋषींच्या यंत्रणेशी जोडले जातो. ऋषी कायम आपल्यावर देखरेख करतात. आपले मूल्यमापन करण्यासाठी ते असे करत नाहीत तर आपल्या साधनेच्या मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी ते असे करतात.
जेव्हा तुम्ही प्रगतीचा आढावा टाळता तेव्हा त्यावरून दिसते की तुम्ही योग्य रीतीने ध्यान केलेले नाही. अशा वेळी तुम्ही नम्रतेने स्वीकारले पाहिजे की यासाठी तुम्हीच जबाबदार आहात. आढावा घेणाऱ्या शिक्षकांकडे याच दृष्टीने जा. त्याचा तुम्हाला फायदा होईल. शिक्षक ऋषींचे केवळ साधन असतात. ते ऋषींचे प्रतिनिधित्व करतात.

भविष्यकाळ जास्त कठीण, गोंधळात टाकणारा व कसोटी पाहणारा असेल. आपल्याला आध्यात्मिक मार्गापासून च्युत करण्यासाठी काळ्या शक्ती शक्य तितके सर्व प्रयत्न करतील. तुम्ही या गोष्टींची जाणीव ठेवली पाहिजे. सतत सावध राहा आणि ऋषींशी एकतान होऊन राहा. प्रकाश सतत जवळ बाळगा. तुम्हाला काही संदेश मिळाला असे वाटत असेल तर मला विचारून खात्री करून घ्या. तुमचे अनुभव मला लिहून कळवा. त्यामुळे तुमचा संभ्रम दूर होण्यास मदत होईल. तुम्हाला सूक्ष्म स्तरावर काही सूचना मिळतील, त्या पाळू नका, कारण त्या कोणाकडून मिळतात ते तुम्हाला माहीत पडत नाही. ऋषींकडून मिळणारे संदेश नेहमी माझ्या माध्यमातून येतात.

आमचा प्रत्येक विद्यार्थी आणि इतर लोकसुद्धा 'प्रकाशमय जीवन' या पुस्तिकेत दिलेले उपचाराचे तंत्र वापरू शकतात. आम्ही उपचार करतो. तुम्ही सुद्धा दरदिवशी उपचारक ऊर्जा पाठवू शकता. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क ७०० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ–मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- सगळ्या शंका आणि प्रश्नांची उत्तरं गुरुजी स्वतः देतात.
- मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा.

## गुरुजींकडून विशेष सूचना

- विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## समर्पण

प्रगती राज, अनुवाद : वैशाली जोशी

समर्पणाची अवस्था ही बहुधा ओल्या मातीच्या अवस्थे सारखी असावी, जिथे आपण ऋषींना आपल्यास घडवू देतो. समर्पणात आपण कोणी विशिष्ट व्यक्ती नसतो. तसेच, आपण सृष्टीतील प्रत्येक गोष्टीशी एकात्म असतो. ज्याप्रमाणे एक थेंब ओघळून महासागरात जाऊन मिळतो आणि अशा रीतीने स्वतः संपूर्ण महासागरच बनतो, तसेच हे आहे. समर्पणाने जेव्हा आपल्याला एक महासागर बनता येते तेव्हा केवळ एक थेंब म्हणून का राहावे? समर्पणात आणि विनयशीलतेत एवढी ताकद आहे.

तपोनगरात प्रवेश करताना आपण एक देऊळ पाहतो जेथे महाबली हनुमान त्यांच्या सर्व शक्तींच्या समर्पणाचे द्योतक म्हणून विनम्रपणे उभे आहेत !

आणि नंतर तेथे भेटतात एक शांत ऋषी, ज्यांच्या डोळ्यात आपल्यासाठी प्रेम झळकताना दिसते. ऋषींप्रती त्यांच्या समर्पणामुळे आणि विनयशीलतेमुळे ते स्वतःला केवळ एक 'मार्गदर्शक' म्हणवतात, यद्यपि आपल्याला माहीत आहे की ते ह्यापेक्षा खूप जास्त काही आहेत.

सर्वज्ञ, प्रबळ आणि कनवाळू ऋषी, ज्यांच्या क्षमतांचे आकलन मानवी समजूतींनी कधीच होऊ शकत नाही, ते नित्य ईश्वराला समर्पित अशा अचल अवस्थेत असतात. प्रेमात केवळ समर्पणच असते. ■

## जगण्याची अवस्था

प्रगती राज, अनुवाद : वैशाली जोशी

तपोनगर जरी एक स्थान असले तरी वास्तवात ती एक जीवन जगण्याची अवस्था आहे.

सकारात्मक होणे आणि प्रेमाचे प्रकटीकरण करणे या साध्या शिकवणी मनात रुजवून घेतल्याने आपल्यापैकी प्रत्येक जण, पृथ्वीच्या पाठीवर कोणत्याही भागात राहिला तरी एक तपोनगर निर्माण करीत आहे, जी शांती, प्रेम, सुसंवाद आणि सर्वांसाठी आदराची अवस्था आहे.

ज्या क्षणी आपल्याला आकलन होते की ही संपूर्ण सृष्टी प्रेमरूपी एका महान शक्तीतून उद्भवली आहे आणि आपण सर्व आपल्यात भिन्नता असूनही जोडलेले आहोत, आणि एकात्मतेने राहू शकतो, तेव्हाच आपल्या अंतरंगात तपोनगराचा जन्म होतो. ज्या क्षणी आपण तपोनगर आपल्या अंतरंगात बाळगायला सुरुवात करतो आणि आपल्या अवतीभवती आपल्या दैनंदिन जीवनात त्याला प्रकट करायला सुरुवात करतो, त्या क्षणी ऋषींच्या या निवासस्थानापासून असलेले आपले भौतिक अंतर संपते. ■

## गुरुजींना आलेल्या पत्रांतील काही वेचे

संकलन : वैशाली जोशी, अनुवाद : एकनाथ कुलकर्णी

स्वयंसेवक म्हणून सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल माझे मन कृतज्ञतेने भरले आहे. माझ्याकडून ज्या ज्या अपेक्षा आहेत त्या सर्व पूर्ण करण्यासाठी मी आपल्या मार्गदर्शनाची आणि आशीर्वादाची विनंती करते. आपण आम्हास जीवन जगण्याचा आणि अनुभवण्याचा आनंद नव्याने शोधण्यात मदत करीत आहात. फक्त माझ्यावर आणि माझ्या प्रियजनांवरच नाही तर संपूर्ण सृष्टीवर पसरलेली आपली कृपा मी अनुभवते आहे. सुसंवाद आणि शांतीचा अनुभव विस्मयकारक आहे. 'हा खरोखरच समाधानकारक आणि अंतरंगाला समृद्ध करणारा अनुभव आहे'.

– उषा सतीशचंद्रा

मी मानसामध्ये जवळजवळ रोजच ध्यान करण्यासाठी आणि ऋषींसोबत काही वेळ घालवण्यासाठी येते. यामुळे माझ्यातील सकारात्मकता वाढली आहे. मी प्रेमरूपी ऊर्जेची कल्पना करते आणि आनंदमय होऊन जाते. 'मानसा' चा एक घटक असल्याबद्दल मला खूप चांगले वाटते आणि त्याचा अभिमानही वाटतो. जेव्हा मी मानसाबद्दल लोकांशी बोलते, जेव्हा मी त्यांना सांगते की, हे माझे 'मानसा' आहे आणि मी ह्याचा एक घटक आहे, तेव्हा मला मानसाबद्दल एक प्रकारचा निराळाच आपुलकीयुक्त हक्क जाणवतो.

– सुधा रमन

मला वाटते आता प्रकाशाशी माझे नाते जडले आहे. मी अधिकाधिक चमत्कार अनुभवतो आहे आणि मला असे वाटते मला जे काही हवे आहे ते सर्व दिले जात आहे आणि माझी काळजी घेण्यात येत आहे.

– संदीप बॅनर्जी

२७ नोव्हेंबर २०११ रोजी मी कॉस्मिक टॉवरशी संपर्क साधून, एका व्यक्तीला पांढरा प्रकाश आणि प्रेम पाठवले. त्यानंतर मी तिला तिचे मन मोकळे करू दिले आणि मीही शांतपणे माझी बाजू मांडली. याचे श्रेय माझ्या हृदयामध्ये वसणाऱ्या गुरुजींच्या प्रकाशाला आहे. निघताना मी तिला मिठी मारली आणि सांगितले, 'आपण प्रेमपूर्वक राहू आणि एकमेकांना प्रकाश पाठवू.' कॉस्मिक टॉवर मधून काही ऊर्जा माझ्यात प्रवाहित झाल्याचे मी प्रत्यक्ष अनुभवू शकले.

– सौम्या अजय

या मार्गाचा मला किती फायदा झाला आहे, हे मलाच ठाउक आहे. माझ्या वैयक्तिक बाबींबद्दल आपले मार्गदर्शन मागण्यास मला संकोच वाटला, कारण आपण आपल्या ध्यान–वर्गांमध्ये सांगत आला आहात की, आपल्या अंतःप्रेरणेच्या मदतीने आपले निर्णय आपण स्वतःच घ्यायला हवे. परंतु आमची अंतःप्रेरणा मर्यादित असल्यामुळे आणि आमचे मन संभ्रमित अवस्थेत असल्यामुळे माझ्यासारख्या लोकांना आपल्या सल्ल्याची गरज असते. मी आपल्या सल्ल्याबद्दल व मदतीबद्दल आपली आभारी आहे.

– गीतासरस्वती

## प्रश्नोत्तरे

संकलन: शोभा राव, अनुवाद: सुनिता देशपांडे

**प्र. सध्याच्या काळात लोकांच्या मनात असलेला गोंधळ, हा नकारात्मक शक्तींनी निर्माण केला आहे का?**

उ. जर आपल्या मनात गोंधळ असेल, तर तो आपण स्पष्टपणे निवड न केल्यामुळे आहे. नकारात्मक शक्ती आपल्या मनात आधीपासूनच असलेल्या गोंधळाचा फायदा घेतात. त्या कदाचित थोड्या प्रमाणात हा गोंधळ वाढवू शकतील, पण त्या स्वतःहून आपल्या मनात गोंधळ निर्माण करत नाहीत.

**प्र. आपली पृथ्वी आता चवथ्या आयामात (डायमेंशन) प्रवेश करते आहे, असे ऐकण्यात येत आहे. अशावेळी आपण मानवप्राण्यांकडून काय अपेक्षित आहे?**

उ. आपल्या पृथ्वीच्या चवथ्या आयामात किंवा उच्च आयामात प्रवेश करण्याचा अर्थ असा आहे की पृथ्वीच्या स्पंदनांची किंवा कंपनांची फ्रीक्वेंसी सूक्ष्म होईल. अशा परिस्थितीत आपल्याला आपल्या विचारांची, भावनांची आणि जगण्याची फ्रीक्वेंसी वाढवावी लागेल.

**प्र. या काळात निरनिराळ्या ऊर्जा कार्यरत आहेत. या ऊर्जा म्हणजे, अग्नी, वायु किंवा इंद्र यांच्यासारख्या देवता आहेत का? त्यांना आवाहन करता येते का?**

उ. ती व्यक्तित्वे आहेत, पण देवता किंवा उच्च अस्तित्वांसारखी नव्हे. कोणत्याही इतर ऊर्जेप्रमाणे, ऋषींनी प्रसारित केलेल्या पुष्कळ प्रकारच्या ऊर्जा, ज्या पृथ्वीवर कार्यरत आहेत, त्यांच्याजवळही प्रज्ञा असते. या प्रज्ञेच्या क्षेत्राचा एक गाभा असतो आणि त्या गाभ्याला एका व्यक्तित्वाच्या रूपात आवाहन करता येते. प्रथम आपल्याला या ऊर्जांची ओळख पटवावी लागेल, मग त्यांच्या गाभ्याशी संपर्क साधून त्यांना आवाहन करावे लागेल.

**प्र. या ऊर्जा आपल्या शरीर-प्रणालीत कार्य करून आपल्या कर्मांचा क्षय करतात का?**

उ. सर्व ऊर्जा कर्मांचा क्षय करत नाहीत. जेव्हा आपण ध्यान करतो तेव्हा या ऊर्जा आपल्यात कार्य करत असतात. त्या आपली अंतःप्रेरणा तीक्ष्ण करतात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्या आपाल्यातील नकारात्मकता दूर करतात. आता आपण कलियुगात नसून नवयुगात प्रवेश केलेला आहे, या सत्याबद्दल आपल्याला जागृत करणे, हे या ऊर्जांचे मुख्य कार्य आहे.

**प्र. या शक्ती केवळ प्रलयकाळातच सक्रिय असतात का? त्या सर्व युगांमध्ये या पृथ्वीवर असतात का?**

उ. नाही. या ऊर्जा विशेष उद्देशांसाठीच इथे आणल्या जातात. नवयुगात प्रवेश करण्यात आपली मदत करण्यासाठीच त्या खास करून आणल्या जातात. आपण प्रलय-ऊर्जा असे त्यांचे वर्गीकरण करू शकतो. कार्य करता करता या ऊर्जांचा व्यय होतो. आपण पूर्णपणे नवयुगात प्रवेश केल्यानंतर या ऊर्जांची आवश्यकता नसते. ऋषी, वेगवेगळ्या युगांमध्ये आवश्यक त्या वेगवेगळ्या ऊर्जा, पृथ्वीवर आणत असतात.

**प्र. जसजसा आपण आपल्या कर्मांचा क्षय करतो, तसतसे आपण आपोआपच जगापासून अलिप्त होतो का ?**

उ. असं वाटतं खरं, पण असं होत नसतं. आपल्या आध्यात्मिक प्रगती सोबत आपण अलिप्त होण्यासाठी आणि आपल्या जीवनातील विविध गोष्टींचे अग्रक्रम ठरवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत. ही एक वेगळी प्रक्रिया आहे.

**प्र. जेव्हा आपण आध्यात्मिक प्रगती करत असतो, तेव्हा आपल्याला अधिक मन-द्रव्य (माइंड-मॅटर) मिळत असते का?**

उ. जेव्हा आपण आध्यात्मिक प्रगती करतो, तेव्हा आपले मन स्वच्छ होते, अधिक शुद्ध होते आणि त्यामुळे मनाची कार्यक्षमता वाढते. आपण अधिक माइंड-मॅटर गोळा करत नसतो, कारण त्याची गरज नसते.

**प्र. आपल्याला जर जास्त माइंड-मॅटर मिळाले तर आपल्यात नव्या क्षमता विकसित होतात का?**

उ. नाही.

**प्र. आम्ही जर आपल्या सूचनांचे पालन केले तर आम्ही अशा स्तरावर पोहोचू का, जेथून आपण आम्हाला आणखी वर नेऊ शकाल?**

उ. होय. त्या स्तरावर तुमच्या पोचण्याची मी वाट पाहत आहे. तुम्ही त्या स्तरापर्यंत पोहोचा किंवा पोहोचू नका, आम्ही सतत तुमच्यासोबत आहोत.

**प्र. आपण गुरूंचा शोध घेतो की, गुरू आपला शोध घेतात?**

उ. जेव्हा आपण तयार असतो, तेव्हा गुरू, म्हणजेच परमेश्वर आपल्याजवळ येतो. तो कदाचित एखाद्या पुस्तकाच्या माध्यमातून, एखाद्या अनुभवातून किंवा कदाचित आजारपणाच्या रूपाने सुद्धा आपल्या जवळ येतो. तो तर केव्हाही आपला शोध घेऊ शकतो पण आपल्याला मात्र त्याला शोधण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. ■

## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| 2012 - End or Beginning | 100/- |
| iGuruji - Vol 1 | 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 3 | 150/- |
| iGuruji - Vol 4 | 150/- |
| iGuruji - Vol 5 | 100/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis | 250/- |
| Channelled Knowledge from the Rishis Vol-2 | 150/- |
| Guruji Speaks Part - I | 200/- |
| Guruji Speaks Part - II | 200/- |
| Guruji Speaks Vol - 3 | 150/- |
| Guruji Speaks Vol - 4 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 2 | 200/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| ऋषींकडून मिळालेले ज्ञान (Marathi) | 200/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| २०१२ – अंत की आरंभ? (Marathi) | 100/- |
| २०१२ सालाची तयारी (Marathi) | 100/- |
| आयगुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| २०१२ सालाची तयारी (Marathi) | 100/- |
| ध्यान कैसे करे (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |

### ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)

मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१-२८६-१८९०/२४४-९५८५)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)

द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)


द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)

उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)

यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

RNI. No. KARMAR/2008/27314 Registered Postal Regn. No. L/CNA/68/2010-11
Date of posting Newsletter-25th of Every Month. Posted at Bangalore GPO No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९)

### मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मध्ये ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे "मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०-जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

# आध्यात्मिक अनुभव

(संकलन: शोभा राव, अनुवाद: गुरुराज कानाडे)

ऑक्टोबर २०११ च्या पहिल्या आठवड्यात, ध्यानानंतर डोळे मिटून दैनंदिन पूजा आणि आरती करताना, मला एक भव्य मंदिर दिसले. तेथे देवतेच्या मूर्तीच्या ठिकाणी प्रकाश होता. मंदिर देखील प्रकाशाने भरलेले होते. लोक तेथे प्रकाश अर्पण करीत होते तर काही प्रकाश प्राप्त करण्यासाठी तेथे आले होते. तेथील पुजाऱ्यांनी दिलेला तीर्थप्रसाद सुद्धा प्रकाशरूपच होता ! लोक अतिशय तेजस्वी दिसत होते. त्यांचे देह प्रकाशरूपी असावेत. मला वाटले की मी देखील त्या दृश्याचा एक भाग होते. माझे शरीर अतिशय हलके झाले होते. मी पराकोटीची शांती अनुभवली. मला अनुग्रहीत झाल्यासारखे वाटले.

– सरोज सावळे

काही दिवसांपूर्वी मी रात्री खूप उशीरा झोपले. काही वेळानंतर बॅटरीचा चार्ज कमी झाल्यामुळे माझा मोबाईल 'लो बॅटरी' सिग्नल देऊ लागला. मी त्याकडे दुर्लक्ष करून तशीच झोपले. सकाळी जेव्हा अलार्म झाला तेव्हा मोबाईल मध्ये ३३% चार्ज शिल्लक होता. ध्यानानंतर जेव्हा मी पाहिले तेव्हा मोबाईलची बॅटरी १००% चार्ज झालेली होती ! नंतर दोन संपूर्ण दिवस ती बॅटरी चालली !

– जस्प्रीत कौर

अनंत चतुर्दशीला मी ध्यानासाठी श्रीगणेशाच्या मूर्ती समोर बसले होते. त्यावेळी मला कोणीतरी स्पष्ट सूचना देत असल्याचे मी ऐकले व माझ्याभोवती असलेले कवच बळकट होत होते. मला एक मोठा व सुंदर डोळा माझ्यासमोर दिसला. नंतर माझ्या लक्षात आले की, तो डोळा श्रीगणेशाचा होता. त्याच जागी गुरुजी पद्मासनात ध्यानस्थ बसलेले मला दिसले. मला त्यांच्या डोक्याभोवतीचे प्रभामंडळ देखील दिसले.

– अनुराधा वाईकर

माझ्या इतरांबरोबरच्या संभाषणात जेव्हा लोक त्यांचे दु:ख व्यक्त करतात, तेव्हा मी त्यांचे दु:ख प्रत्यक्षात अनुभवू शकते आणि माझा घसा व हृदय दुखू लागते. लगेच मला जाणवते की माझ्या हृदयातून प्रकाश बाहेर पडून माझ्या सर्वांगात पसरत आहे आणि काही क्षणातच मी पूर्ववत आनंदी स्थितीत परतते. हे असे घडते की जणूकाही कोणीतरी माझ्या आनंदाच्या पातळीचे निरीक्षण करीत आहे आणि जेव्हाही काही कारणाने ती पातळी खालावते, तेव्हा ही शुद्धीकरणाची प्रक्रिया आपोआपच सुरू होते !

– सौम्या अजय

साधारण दोन महिन्यांपूर्वी मी नुसतीच शांत बसले होते. अचानक मला साक्षात्कार झाला की 'परम सत्य' किंवा 'ईश तत्त्व' माझ्यापासून कुठे दूर नाही; नव्हे, मी त्याच 'सर्वव्यापी सत्याचा' एक सूक्ष्म कण आहे. 'हे जे सर्वव्यापी तत्त्व आहे' ते दुसरे तिसरे काही नसून 'अत्युच्च शुद्ध जाणीव' आहे. ज्या परमात्मशक्तीमुळे सर्वकाही शक्य होते, ती शक्ती माझ्या आत वास करते आणि मी तेच 'शुद्ध अस्तित्व' आहे. ह्या साक्षात्कारानंतर माझा दृष्टिकोन आमूलाग्र अभिक्रांत झाला. माझ्या भोवतालचे जग जरी पूर्वीचे तेच जग असले तरी माझ्यासाठी आता ते पूर्वीचे राहिले नाही. हे सर्व आपणच निर्माण केले आहे हे कळल्यामुळे वस्तुस्थितीचा स्वीकार आणि शरणागती विनासायासच घडतात.

– पूर्णिमा परुळेकर

एके रात्री मी बिछान्यात पहुडले आणि कल्पना केली की माझे शरीर पूर्णपणे पांढऱ्या प्रकाशाने भरलेले आहे. आणि मग प्रकाशास प्रार्थना केली की त्याने माझ्या माध्यमातून प्रवाहित होऊन पृथ्वीवर सर्वत्र व आतील पोकळ भागातही पसरावे. मग एकाएकी मला माझ्या हृदयस्थली एक मोठा चकाकणारा शुभ्र पांढरा हिरा असल्याचे जाणवले. प्रकाश त्या हिऱ्यातून प्रवाहित होऊन सर्वत्र पसरत होता. त्या हिऱ्याच्या अस्तित्वाची जाणीव नंतर काही दिवस मला होत होती.

– प्रगती राज

माझ्या मुलीच्या १३ व्या वाढदिवशी मी तिला इतर भेटवस्तूंसोबत प्रकाश प्रवहनाचे तंत्र देखील शिकविले. मी तिला सांगितले की आतापर्यंत दिलेल्या सर्व भेटींपेक्षा ही सर्वात अमूल्य भेट आहे आणि तिने नियमितपणे सकाळी व रात्री याचा अभ्यास करावा. नंतर ती मला म्हणाली, "मी प्रकाश प्रवहन केले. हा एक अद्भुत व अनोखा अनुभव होता. प्रकाश प्रवहन करून मला जे योगदान देता आले त्याचा मला अतिशय आनंद होतो आहे." माझे डोळे पाणावले. माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी माझ्याजवळ शब्द नव्हते.

– विश्वास दीक्षित

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 200/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore-86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande